प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA

संचार विभाग, केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358

वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

फेब्रुवारी 4, 2019

**किसान क्रेडिट कार्ड (केसीसी) योजना - पशुपालन व मत्स्यपालन उद्योगांसाठी कार्यकारी भांडवल**

किसान क्रेडिट कार्ड योजनेचा उद्देश, शेतक-यांना लघु मुदतीच्या पीक कर्जासाठी, लवचिक व सुलभ कार्यरीतीद्वारे एकाच खिडकीतून बँकिंग प्रणालीकडून पुरेसे व वेळेवर कर्ज सहाय्य उपलब्ध करुन देणे हा आहे. ह्या योजनेची कार्यकारी लवचिकता, पशुपालन व मत्स्यपालन उद्योग करणारांनाही मिळावी ह्यासाठी अशा शेतक-यांनाही केसीसीच्या ह्या सुविधा दिल्या जाण्याबाबतचा निर्णय, भारत सरकारने, 2018-19 च्या अंदाजपत्रकात घोषित केला होता. ह्या बाबीची तपासणी करण्यात आली व सर्व स्टेक होल्डर्सशी विचार विनिमय केल्यानंतर ठरविण्यात आले की, किसान क्रेडिट कार्ड (केसीसी) च्या सुविधा, पशुपालन करणारे शेतकरी व मत्स्यपालन करणारांनाही त्यांच्या कार्यकारी भांडवलाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी दिल्या जाव्यात.

**अनिरुध्द डी. जाधव**
सहाय्यक व्यवस्थापक

**वृत्तपत्र निवेदन : 2018-2019/1839**